# दोन पर्याय

*प्रा.डॉ.जयंत नारळीकर*

सकाळचे दहा वाजले तेव्हा मिराने दुकानाचे पुढचे दार उघडून वर सारले. तिची आई आणखी अर्ध्या तासाने येणार, आणि मग त्या दोघी दुकान सांभाळणार. तोपर्यंत तिची एकटीची जबाबदारी! वास्तविक वह्या पुस्तकांच्या दुकानाचे मुख्य ग्राहक म्हणजे शाळकरी मुले, व त्यांचे पालक; थोड्या प्रमाणात शिक्षकवर्ग. हे सर्व ग्राहक संध्याकाळी गर्दी करणार. आत्ता आलेच तर आजोबा-आजी नातवंडांची ऑर्डर घेऊन.

अशा वेळी मिरा आपले विणकाम बाहेर काढी. लहानपणापासून तिला विणायची आवड होती. आई वडील, आजोबा आजी, दोन भाऊ, तीन बहिणी अशा कुटुंबात तिच्या विणकामाचे मुबलक ग्राहक होते. पण आता? ती आणि तिची आई असे दोघांचेच कुटुंब होते., मग स्वेटर विणायचे तरी कोणासाठी?

मिराचे उत्तर तयार होते ... सतीश साठी. दर वर्षी सतीश साठी एक स्वेटर विणायचा. ह्या न्यायाने तो गेल्यापासून हा तिसरा स्वेटर ती विणत होती ... गेल्यापासून म्हणजे? ह्या प्रश्नाच्या उत्तराबद्दल वाद होता. वाद तिच्या आणि भारत सरकार मध्ये.

सतीश खुबचंदानी ... भारतीय हवाई दलात एअर कॉमांडर. 'लॉस्ट,प्रिझ्यूम्ड डेड.' पंजाबातील भारत-पाकिस्तान सीमेरेषेजवळ त्याची ड्यूटी होती. एक तणावग्रस्त प्रसंगी त्याचे विमान सराव करीत असताना सीमारेषा ओलांडून गेले. आणि काही मिनिटांतच त्याचा भारतीय रेडारशी संबंध तुटला. पाकिस्तान्यांनी त्या विमानावर क्षेपणास्त्र डागले. पण विमान परत भारतीय हद्दीत येऊन क्रॅश झाले. मात्र त्यांत पायलट नव्हता. त्याने विमानातून उडी मारली असणार. क्षतिग्रस्त होण्याची शक्यता असेल तर पायलटने पॅरेशूट वापरुन उडी मारण्याची विमानात सोय होती. पण मग सतीश उतरला कुठे. भारतीय हद्दीत नक्कीच नव्हे. तो पाकिस्तानात पडला आणि तेथे बंदी झाला. ह्या अपेक्षेने भारताने त्याची-मृत



किंवा जिवंत-कुठल्याही स्थितीत रीतसर मागणी केली. परंतु 'हा आमच्या कडे नाही' म्हणत पाकिस्तानने कानावर हात ठेवले आणि उलट विमानाने सीमारेषेचे नियमबाह्य उल्लंघन केले म्हणून भारताकडे तक्रार नोंदवली.

परस्पर संशयाच्या वातावरणात दोन्ही देश एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करीत होते. त्याच प्रमाणे सतीश खुबचंदानीचा शोध घेणे पण सीमारेषेच्या दोनही बाजूला काही दिवस चालू राहिले. मग तो गेला कुठे? सीमारेषेजवळ दोनही बाजूला पाण्याची मोठी तळी होती. त्यांत तो बुडाला असणार असा तर्क भारतीय वायुसेनेने केला. वर्ष उलटले आणि सतीश भारतात सापडला नाही तसेच पाकिस्ताननेही त्याच्याबद्दल आपल्याला काही माहीत नाही हा पवित्रा कायम ठेवला. अखेर मिराला 'विधवेची पेंशन' चालू झाली.

पण मिराला हा निष्कर्ष मान्य नव्हता. सतीश जिवंत आहे असे तिचे अंतर्मन सांगत होते. एक तर त्याला चांगले पोहता येते आणि प्रसंगावधान वापरुन तो पाण्यात पडला तरी स्वतःला बुडण्यापासून वाचवेल याची तिला खात्री होती. तो पाकिस्तानात कैदखान्यात असेल किंवा, जर पाकिस्तानी खरे बोलत असतील तर त्या देशातच मुक्तपणे वावरत असेल. म्हणून तिने सरकारी पेंशन ज्या बँक खात्यात जमा होत असे त्या खात्यातून पैसे न काढण्याचा निर्णय घेतला.



सतीश नाहीसा झाल्यावर काही महिने तिला त्यांच्या सरकारी फ्लॅटमध्ये राहण्याची परवानगी मिळाली. मग पुढे काय हा प्रश्न तिच्यापुढे होता. तिचे भाऊ परदेशात स्थायिक झाले होते व बहिणी लग्न होऊन भारतातच पण एकमेकांपासून लांब रहात होत्या. वडील निवर्तले होते व आई नागपुरात वह्यापुस्तकांचे दुकान चालवत होती ... गरज म्हणून नव्हे तर वेळ जावा म्हणून. तिच्याच आग्रहावरुन मिरा तिच्याकडे राहायला आली. ती स्वतः गणितात एम.ए.असल्याने तिने फावल्यावेळी शिकवण्या सुरु केल्या. तिच्या तर्कशुद्ध विचारसरणीमुळे आणि मुद्याची गोष्ट सोप्या शब्दात सांगण्याच्या लकबीमुळे तिच्या शिकवण्या लोकप्रिय होत गेल्या आणि मिळकतही वाढत गेली.

मात्र आईकडे राहून मिरा फारशी सुखी नव्हती. कारण तिच्या आईचं पार्वतीबाईंच सतीशशी कधीच जुळले नव्हते. तिचा सतीशशी प्रेमविवाह झाला तो पार्वतीबाईंना बिलकूल आवडला नव्हता. याचे एक कारण म्हणजे त्यांच्या लेखी मिरा आणि सतीशच्या पत्रिका मुळीच जुळत नव्हत्या. त्यांना ह्या बाबतीत सल्ला देणारे ज्योतिषी पंडित रमाकांत त्रिवेदी यांच्या मते " ह्या जोडप्याच्या नशिबी वैवाहिक सुख अत्यल्प आहे. लग्नामुळे मुलीच्या आईस अनेक विवंचनांना सतत तोंड द्यावे लागेल. नवऱ्याच्या स्वभावातल्या काही लकबींपासून पत्नीने सावध असावे."

प्रत्यक्ष मिरा आणि सतीश हे वैज्ञानिक दृष्टिकोनाला महत्व देत असल्याने ह्या बाबतीत पार्वतीबाईंची नेहमी थट्टा करीत. त्रिवेदी महाशयांच्या भविष्याची रेवडी उडवीत सतीश म्हणे " आमचे वैवाहिक जीवन कितीही वर्षे लांबले, टिकले तरी आम्हाला ते सुख अत्यल्प वाटणार इतके आम्ही एकमेकांना हवे असतो. आणि विवंचना म्हणजे नेमक्या कोणत्या ते तरी कळू द्या. उद्या एखाद्या ग्राहकाने खोटा रुपया दिला तर त्याचा दोष आमच्या लग्नाच्या माथी बसणार का? आणि माझ्या

कुठल्या लकबींपासून बिचाऱ्या मिराने सावध असावे ते पंडितजींनी सांगितले तर तिला कितीतरी मदत होईल."

मिरा पण आईला विचारत असे "खरच, तुझे पंडितजी भविष्य सांगतात, ते मोघम शब्दात का? स्पष्ट का बोलत नाहीत? त्यांनाही तपशील पुरा पुरा माहीत नसावा, नुसते अंदाज बांधतात असे सतीश म्हणतो ते खरे वाटते." जावईबापूंना नाही तरी मुलीला अशा संशयाबद्दल चापायला पार्वतीबाई कमी करत नसत. " तुमच्या सारख्या अति शिकलेल्या अश्रद्धांना अशा शंका सतावणारच. अगं, पंडितजी त्रिकालज्ञानी आहेत. नऊ ग्रह त्यांच्या घरी पाणी भरतात. त्यांचे परिणाम पंडितजींच्या गणितातून सुटतील का? फक्त प्रत्येक विचारणाऱ्याला किती माहिती पचेल तेवढीच ते देतात. कधी कधी वाजवीपेक्षा जास्त माहिती मनाला अस्वस्थ करते म्हणून ती देऊ नये असे त्यांचे मत आहे."

मिराचा फलज्योतिषावर विश्वास नव्हता पण अलीकडे तिचे मन हळवे होत चालले आणि तिच्या अपेक्षेप्रमाणे सतीश आज ना उद्या येईलच ह्या विश्वासाला तडा जात होता. पार्वतीबाई फक्त एकदाच बोलून गेल्या होत्या ... "तरी मी म्हणत होते तुमच्या पत्रिका जुळत नाहीत, तुम्हाला वैवाहिक सुख अत्यल्प आहे असा इशारा पंडितजींनी दिलेला होता ..." पुन्हा त्यांनी तो विषय काढला नाही पण मिराच्या मनात शंकासुर घर करत होता; खरंच पंडितजींना भविष्य कळते का?

* * *

आजही दुकानात बसल्या बसल्या मिरा शंकासुराचे वार परत करु पहात होती पण तिचे प्रयत्न दुबळे पडत चालले होते. सतीशवर तिचे निरतिशय प्रेम होते व त्याला नवरा म्हणून वरल्याबद्दल तिला पश्चात्ताप होत नव्हता. पण जर पंडितजींचे म्हणणे खरे असेल तर आपल्याशी लग्न केल्यामुळे त्याला बिचाऱ्याला मृत्यू...

छे!छे! कसला हा अभद्र विचार ... तिने निकराने मान झटकली आणि विणकाम चालू ठेवले. दुकानात आजचा पहिला ग्राहक आल्याचे तिला डोळ्याच्या कपारीतून दिसले. दाढी मिशा आणि लांब केसवाला ... हा इसम रचून ठेवलेली चित्राची पुस्तके पहात होता. सामान्यपणे अशी व्यक्ती पाहून ती थोडी चमकलीच असती ... अलीकडे काही दुकानांवर दरोडे पडल्याच्या बातम्या येत होत्या. पण ह्या व्यक्तीच्या लकबी तिला काही कारणास्तव परिचित वाटत होत्या.' का ते तिला सांगता आले नसते.

"मॅडम, इन दो किताबों के क्या दाम हुए?" दोन पुस्तके तिच्या समोर ठेवून ती व्यक्ती उद्गारली. मिराने नजर वर करुन पाहिले आणि त्या पुस्तकांवर मागे लिहिलेली किंमत पाहणार इतक्यात त्या व्यक्तीने दोनदा उजवा डोळा मिचकावला आणि म्हणाला. " मिराजी आपका गिरिधर हाजीर है।"

मिरा भयंकर दचकली. दोनदा उजवा डोळा मिचकावणे आणि 'तू मिरा तर मी गिरिधर' असे गमतीने म्हणणे ह्या तर सतीशच्या लकबी... फक्त त्या दोघांच्या प्रेमकूजनापर्यंत मर्यादित... त्या ह्या दाढीमिशीवाल्याला कशा कळल्या? तिने रोखून पाहिले आणि त्या केसांच्या जंजाळातून तिला सतीशचा चेहरा दिसला. चेहऱ्यावर स्मित होते पण डोळ्यात बाहेर पडू पाहणारे अश्रूही. "सतीश!" असे अस्फुट उद्गार काढून ती खुर्चीवरच कोसळली. शुद्ध हरपण्यापूर्वी काउंटरवरची फळी उचलून कोणी तरी आत येत आहे एवढीच तिला जाणीव झाली ... त्याच क्षणी पार्वतीबाईंनी दुकानात एंट्री घेतली.

* * *

'दुकान बंद आहे' अशी पाटी बाहेर अडकवून दार बंद करुन पार्वतीबाई पुन्हा आत आल्या. मिरा तोपर्यंत शुद्धीवर आली होती, आणि 'तो दाढीवाला इसम' कोणी मवाली नसून सतीशच आहे याची तिने आईला खात्री पटवली. मिरा हर्षाने वेडीच झाली होती... मुलीचे सौभाग्य शाबूत आहे हे पाहून पार्वतीबाईंना एकीकडे समाधान वाटत होते तर दुसरीकडे जावई बापूंच्या पुनरागमनामुळे बदलणारी समीकरणे त्यांना अस्वस्थ करत होती.

" थांब ग! सगळे आख्यान आता मायलेकींना ऐकवतो पण आधी पोटपूजा करतो." मिराने लगबगीने मांडलेल्या खाद्यान्नाकडे आणि बदामाच्या दुधाकडे पाहत सतीश उद्गारला.

" पण असे न सांगता का आलात? पत्र किंवा तार तरी करायची " पार्वतीबाई म्हणाल्या. तोंडातला घास संपवून आणि दुधाचा घोट घेऊन सतीश शांतपणे उद्गारला.

" पण मिरा नेमकी कुठे आहे ते कसे कळणार? तुमचा पत्ता माहीत होता, म्हणून म्हटले इकडे तर चवकशी तरी करावी. म्हणून आलो इकडे दुकानात मिराच दिसली काउंटरमागे."

"एकंदरीत जिथे कुठे होता तिथे मजेतच होता ना?" पार्वतीबाईंनी विचारले.

" असं काय विचारतेस आई! शत्रूच्या गोटात तो मजेत कसा असेल?" मिराने विचारले.

" पुरुषांना मौजमजा करायला अवघड जात नाही." पार्वतीबाई खोचकपणे म्हणाल्या. सासूबाई बदलल्या नाहीत हे सतीशने ओळखले. त्यांच्याशी शाब्दिक चकमकी पूर्वीप्रमाणेच कराव्या लागणार. तो लगेच म्हणाला. " मी लवकरच सगळे सांगतो ... मग तुम्हीच ठरवा मौजमजा किती केली ते."

दहा मिनिटे सतीशची पोटपूजा चालली. मग पाणी पिऊन ढेकर देत तो म्हणाला " काही झाले तरी घरचे जेवण ते घरचे ... नाही का?"

" मग आता सांग तुझी कहाणी ... मला फार उत्सुकता आहे." मिरा म्हणाली सतीश सोफ्यावर हात पाय पसरुन बसला आणि म्हणाला " बहोत लंबी दास्ताँ है...

" त्या दिवशी आम्ही पंजाबच्या सीमेरेषेजवळ दक्षिणेकडे उड्डाणे केले. आमच्या ग्रुप मध्ये पाच मिग -२३ वाले होते. पूर्वी सुद्धा आम्ही पाचच्या ग्रुपमध्ये वेगवेगळ्या फॉर्मेशन करीत उड्डाणे केली होती. तेव्हा आम्हा पाचही जणांना हा रुटीन सरावच होता. त्या दिवशी हवा मस्त होती. लख्ख ऊन, हिवाळ्यातला सुखद गारवा, वारा पडलेला, सारे काही शांत शांत. आम्ही आपापसात म्हटले देखील ... आज दिवस छान आहे."

पार्वतीबाई सूचकपणे खोकल्या. सतीशने वळून त्यांच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले. त्या म्हणाल्या "इतरांबद्दल माहीत नाही पण तुमच्यासाठी तो दिवस नक्कीच छान नव्हता."

"म्हणजे? मी नाही समजलो." सतीश म्हणाला. मी नंतर पंडितजींना विचारले तेव्हा त्यानी तुमची पत्रिका बघून सांगितले की तो दिवस तुम्हाला अशुभ होता. त्या दिवशी तुम्ही उड्डाण करायला नको होते असा त्यांनी सल्ला दिला."

सतीशने सातमजली हास्य केले.


खमंग स्वादिष्ट भज्यांसाठी

**बेडेकर भजी पीठ**



आपल्या नजिकच्या दुकानात मागा


"पंडितजी? म्हणजे ते कोण चतुर्वेदी का त्रिवेदी महाशय ना? त्यांचे सल्ले नेहमी पश्चात्-बुद्धीचे असतात. त्यांच्याच सांगण्यावरुन तुम्ही मीराचे नाव मिरा केलेत?"

सतीश आणि त्याच्या सासूबाईंच्या मध्ये जे सतत वाद चालायचे त्यांत हा एक होता. मिरा जन्मली तेव्हा तिचे नाव'म' ह्या अक्षराने सुरु व्हावे असा निर्वाळा पंडितजींनी दिला. तेव्हा तिचे नाव 'मीरा' ठेवण्यात आले. पण लहानगी मीरा सहा महिन्यांची होईपर्यंत पुष्कळदा सर्दी-खोकला-ताप याने बेजार होत असे. तिच्या वडिलांनी प्रख्यात डॉक्टरांचा सल्ला घेतला. त्यांनी घरी येऊन पाहिले. मीराची कॉट खिडकीच्या फार जवळ होती आणि खिडकी पुष्कळदा उघडी असल्याने भरपूर वारा आत येई. खिडकी बंद ठेवून एरव्ही सुद्धा बाळाला वारा लागू देऊ नका अशी त्यांनी ताकीद दिली. शिवाय इतर काही उपयुक्त सूचना आणि काही सौम्य औषधे दिली. दरम्यान पार्वतीबाई पंडितजींच्याकडे सल्ला घ्यायला गेल्या. त्यांनी सर्व काही ऐकून निदान केले. "औषधांचा काही उपयोग होणार नाही पण डॉक्टरांच्या समाधानासाठी चालू ठेवा. खरी गोम तिच्या नावात आहे. तुम्ही 'म' हे आद्याक्षर बरोबर निवडले पण मात्रेचा घोळ केलात. तिच्यापत्रिके प्रमाणे तिला

सम मात्रा आ, ई, ऊ, ऐ इत्यादी घातक आहेत. विषम मात्रा पाहिजे." पार्वतीबाईंनी 'मीरा' चे 'मिरा' केले. त्यानंतर दोन महिन्यात मिराचा सर्दीखोकला पळाला.

मिराच्या वडिलांचे म्हणणे की डॉक्टरी सल्ल्याचा फायदा झाला तर पार्वतीबाईंचा विश्वास होता की हा नाव बदलल्याचा परिणाम! पुढे सतीशला हे कळले तेव्हापासून तो नेहमी पार्वतीबाईंना ह्या विषयावर डिवचत असे.

"आता त्याबद्दल वाद नको उगाच! सतीश तुझी गोष्ट पुढे चालू ठेव." मिरा म्हणाली. पूर्वानुभवाने तिला माहीत होते की आत्ताच आवरले नाही तर हा वाद आणखी चिघळेल. सतीश पुढे म्हणाला.

"तर मी त्या दिवशी उडण्यात चवथ्या क्रमांकावर होतो. उड्डाण व्यवस्थित झाले. आम्ही सर्व नेहमीच्या सरावाप्रमाणे वेगवेगळ्या फॉर्मेशन्समध्ये विमाने उडवली आणि त्याच क्रमाने खाली यायला निघालो. पण मला वाटेत एकाएकी एक वेगळेच विमान भेटले. ते कुठले व कसे त्या भागात आले - कारण आमच्या कवाइतीच्या वेळी इतर विमानांना तिकडे येण्याची मनाई असते- मला त्या वेळी ह्या प्रश्नांचा विचार करणे शक्यच नव्हते. क्षणात निर्णय घेऊन समोरुन येणाऱ्या विमानाची टक्कर कशी टाळायची इकडे माझे लक्ष गुंतले होते. सुदैवाने विमानातल्या रेडारने मला थोडी पूर्वसूचना दिली होती. मी दिशा बदलून टक्कर टाळली.

"पण तरी माझे विमान इतके वेगात होते आणि पाकबरोबरची सीमारेषा इतकी नजीक होती की मी ती केव्हा ओलांडली ते कळलेच नाही. पण लवकरच विमानातल्या दिशादर्शक यंत्रणेने ते माझ्या नजरेस आणले. आणि त्याचबरोबर रेडार ने एक क्षेपणस्त्र विमानाच्या दिशेने येत असल्याचे दर्शवले. पाक्यांनी जरा सुद्धा वेळ फुकट घालवला नाही! आता ते क्षेपणास्त्र विमानाचा पाठलाग करत त्याला खलास करणार. मी विमानाची दिशा भारताकडे वळवली आणि स्वतः बाहेर पडण्याचे बटन दाबले.

"इजेक्शनची कसरत आम्ही पूर्वी केली असल्याने सर्व व्यवस्थित झाले. आता आपण बहुतेक शत्रूच्या हद्दीत पडणार. आपला शोध करत पाकिस्तानी सोजीर येतील. बंदी झाल्यावर काय करायचे याचे पण प्रशिक्षण आम्हाला दिले असल्याने मी तसा गोंधळलेला नव्हतो.

"पण घडले काही तरी वेगळेच आणि नाट्यमय! मी पॅराशूट सकट उतरलो तो भाग जंगली वाटला ... म्हणजे पुष्कळ झाडे, वस्ती नाही, शेते नाहीत असा. पण निर्मनुष्य नव्हता. उतरता उतरताच मला शब्द ऐकू आले "बचाओ ... बचाओ ..." झटपट पॅराशूट वेगळी करुन गुंडाळून घेतली आणि आवाजाच्या दिशेने निघालो. जवळच झटापटीचे दृश्य दिसले. एका पांढऱ्या दाढीवाल्या वृद्धाला दोघे तरुण मारत होते. मी फार वेळ न दवडता माझे रिव्हॉल्व्हर काढून दोन गोळ्या दागल्या ते दोघे मारेकरी जागच्या जागी ठार झाले.

"मी त्या वृद्धाला सावरले कारण तो रक्तबंबाळ झाला होता. पण शुद्धीवर होता. मला तो खुदाने पाठवलेला देवदूत वगैरे म्हणत दुआ देऊ लागला. मी माझ्या पाठीवरच्या फर्स्ट एड किट मधून सामान काढून औषध व बॅण्डेज वापरुन त्याचे औषधपाणी केले. आणि त्याला विचारले 'चाचाजान आपको घर पहुँचा दूँ?' तेव्हा त्याने होकारार्थी मान हालवली. त्याचे घर जवळच होते.

"मुहम्मद अब्दुल्ला त्याचे नाव. तो आणि त्याची पत्नी फातिमा बेगम बऱ्यापैकी प्रशस्त फार्म हाउसमध्ये राहात होते. त्याची बरीच शेतजमीन होती. एक मुलगा आणि एक मुलगी ही दोन अपत्ये, पैकी मुलगा लाहोर मध्ये कसला तरी व्यापार करत होता तर मुलगी आणि जावई यू.ए.ई. मध्ये होते. एकंदरीत सधन कुटुंब, एकटेच राहणारे म्हणून त्यांवर दरोडेखोरांचा डोळा होता. त्याच्या सुदैवाने मी त्याचे रक्षण करायला अक्षरशः आकाशातून अवतरलो म्हणून तो मला अल्ला का फरिश्ता म्हणत होता यांत आश्चर्य नाही. मी मात्र त्याला मी कुठून आलो ते खरे खरे सांगितले.

"वास्तविक मी भारतीय आहे म्हटल्यावर त्याने मला पाक सैन्याच्या ताब्यात द्यायला हवे होते. पण मला कसे वागविले जाईल या बद्दल शंका होती, त्याला तसेच मलाही. शेवटी तो म्हणाला "मी तुला माझ्या मुलाचे कपडे देतो. ते घाल. तुझा हा एअरफोर्सचा युनिफॉर्म मी माझ्या भट्टीत जाळून टाकतो. हे सर्व चटपट करायला हवे. कारण माझे दोनही नोकर बाहेर गेलेत ते आता येतील तासा भरात. त्यांना मी सांगणार आहे की तू माझा अमेरिकेतून आलेला भाचा."

"इंग्लंड केले तर ? मी रॉयल एअरक्राफ्ट एस्टॅब्लिशमेंट, फार्नबरामध्ये वर्षभर होतो."

"चालेल ... तर तुझे नाव जमाल... कोणी विचारले तर एवढेच नाव सांग. तुझे ऊर्दू बऱ्यापैकी आहे."


"उर्दू? मी तर हिंदी बोलतोय!" मी उत्तरलो. मग आम्ही दोघे हसलो. तो म्हणाला" फक्त ते तुमचे संस्कृतमध्ये बनलेले शब्द काढून टाकावे. त्या ऐवजी इंग्रजी शब्द वापर. ऐकणाऱ्याची समजूत होईल की विलायतेत राहून जमालच्या भाषेत इंग्रजी शब्द येणारच."

"तो बोलता बोलता माझ्या वर्दीची विल्हेवाट लावत होता तर मी अघळपघळ सुरवार कुर्त्यावर जांभळे जाकीट घालून आरशात पाहात होतो. तो पर्यंत फातिमाबेगम चिकन कबाब आणि सरबत घेऊन आली.

"शुक्रिया, फातिमा आंटी" मी कबाब तोंडात टाकत म्हणालो. ती चमकली तर मुहम्मद मियाँ हसत म्हणाले "बेगमसाहिबा हा आपला इंग्लंडमधला भाचा जमाल!"

सतीशचे आख्यान रंगत चालले होते आणि मिरा व त्यांच्या सासुबाई स्तब्धपणे ऐकत होत्या. मिराच्या चेहऱ्यावर निव्वळ कुतूहल होते तर पार्वतीबाईंच्या मुद्रेवर आणि त्यांच्या काही प्रश्नांत कुतूहलाशिवाय किंचित खोचकपणा आहे सतीशला वाटले. पण त्याने तिकडे दुर्लक्ष केले. त्याची - थोडक्यात - उरलेली हकिगत अशी.

सतीशचा शोध करायला पाक लष्करातले लोक त्या भागात फिरत होते. त्यांना ते दोन मुडदे सापडले व गोळ्या ज्या बनावटीच्या रिव्हॉल्व्हर मधून निघाल्या - दोनही बाबतीत - ते भारतीय वायुसेनेचे असू शकेल असा त्यांनी निष्कर्ष काढला. चवकशी करत ते अब्दुल्ला कडे आले तेव्हा त्याने आपल्याला काहीच माहीत नसल्याचे सांगितले. 'जमाल' च्या जबानीतूनही काही निष्पन्न निघाले नाही. पॅराशूट मात्र थोड्या लांब असलेल्या मोठ्या तळ्यात सतीशने बूडवून टाकले असल्याने त्याचा ही पत्ता लागला नाही. अखेर हा भारतीय वैमानिक तळ्यात बुडाला असावा असा तर्क पाकिस्तानी लष्कराने केला आणि भारताला




पाठवलेल्या अधिकृत उत्तरात असा कोणी वैमानिक आमच्या ताब्यात नाही असे कळवले.

हा शोध चालू असेपर्यंत सतीश जमालच्या अवतारात मुहम्मदमियाँकडे राहात होता. पण अर्थातच भारतात परतण्याकडे त्याचे डोळे होते. मुहम्मद मियाँ पंजाब सरहद्दीपासून काही किलोमीटरवरच होते. पण तो भाग संवेदनाशील असल्याने दोनही बाजूने तेथे सतत पाळत असे. त्या भागात सीमारेषा ओलांडणे मूर्खपणाचे ठरले असते. त्या ऐवजी सिंध मध्ये रुकानपुर किंवा इस्लामगढ जवळून राजस्थानात घुसण्याचा प्रयत्न करावा असा मुहम्मद मियाँचा सल्ला होता.

पंजाबातून सिंधकडे जायला ट्रेन वा बस मार्ग होते पण आपले 'सोंग' उघडकीला येऊ नये म्हणून सतीशने सर्व प्रवास पायी करायचा ठरवला. नाहीतरी त्याला हायकिंगची आवड होतीच. मुहम्मदमियाँच्या मदतीने हायकिंगचे बूट, रुकसॅक, कपडे आदी मिळवून 'जमालभाई' अखेर सिंधकडे रवाना झाले.

आयता मौका मिळालाय तेव्हा हा शेजारचा देश पाहून घ्यावा ह्या उद्देशाने सतीश आरामसे रमत गमत फिरला. इस्लामगढला आल्यावर तेथून राजस्थानात थरच्या वाळवंटातून परत येण्याचा त्याचा मनसुबा मात्र लगेच कार्यान्वित झाला

नाही. कारण तेथे ही सीमारेषेवर सतत गस्त चालू असे. काही निवडक प्रसंगीच ही गस्त 'ढिली' पडते असे त्याला समजले. असा प्रसंग यायला त्याला काही महिने थांबावे लागले. अखेर तिथल्या पीरच्या मदारच्या वार्षिक उत्सवाचा फायदा घेऊन तो भारतात शिरला.

वाळवंटातून प्रवास म्हणजे सामान्य हायकिंग नव्हे याची त्याला प्रचिति आली. पण जैसलमेर येथे आल्यावर आता आपण जवळजवळ घरी पोचलो याची त्याला जाणीव झाली. एक अनामिक हुरहुर आता त्याला मिराकडे खेचत होती. पण मिरा असेल तरी कुठे? ती त्यांच्या पूर्वीच्या स्टाफ क्वार्टरमध्ये नक्कीच असणार नाही.

भारतीय वायुदलाच्या मार्फत त्याला तिचा पत्ता मिळू शकला असता. पण त्यासाठी अनेक नोकरशाही चाचण्यांतून त्याला मार्ग काढावा लागला असता. शिवाय त्याचा स्वाभाविक मिश्किलपणा आड आला. एकदम प्रकट होऊन मिराला 'सरप्राइझ' करावे! त्यासाठी वेळ लागला तरी चालेल. त्याच्या सुदैवाने त्याने बांधलेला अंदाज - की ती आपल्या आईकडे रहायला गेली असेल - हा खरा ठरला.

* * *

"अशी आहे आमची दास्तान!" सतीश म्हणाला.

"अगदी परीकथेसारखीच आहे... शेवट गोड झाला याकरता देवाचे आभार मानते मी!" मिरा म्हणाली.

"परीकथेसारखीच काय म्हणतेस? परीकथाच आहे असे मी म्हणते" किंचित-खोचकपणे पार्वतीबाई म्हणाल्या.

"म्हणजे तुम्हाला काय सुचवायचय? चमकून सतीशने विचारले.

"काही नाही!" हे उत्तर देताना पार्वतीबाई नक्कीच 'काही तरी आहे' अशी शंका व्यक्त करत आहेत असे सतीशला वाटले. पण त्या पुढे म्हणाल्या "पण त्रिवेदी महाशयांची भविष्यवाणी खरी ठरली हे मानायला हवे."

"काय म्हणाले त्रिवेदी महाशय?" आता सतीशने खोचवपणे विचारले सासू - जावई यांची पुन्हा जुंपणार ह्या अपेक्षेने मिरा सावध झाली.

"ते म्हणाले होते की ह्या आठवड्यात ज्या व्यक्तीची वाट पहात होता ती तुम्हाला भेटेल."

"खरंच असं म्हणाले होते? मग मला का नाही सांगितलेस?" मिराने विचारले. तिच्या बोलण्यात सकौतुक आश्चर्य होते.

"अगं त्यांत काय विशेष आहे? ती व्यक्ती मीच कशावरुन? गॅस सिलिंडर वाला असू शकेल. किंवा शिंपीणबाई तुझे ब्लाउज घेऊन येणार असेल." सतीश म्हणाला.

"करा थट्टा! तुम्हा अविश्वासी व्यक्तींना ह्या ज्ञानाची किंमतच कळणार नाही." पार्वतीबाई उद्गारल्या. "मी वाद घालण्यात माझा वेळ कशाला फुकट घालवू?"

"थांबा!" एकदम काहीतरी कल्पनेने झपाटल्यासारखा सतीश म्हणाला "आपण सोक्षमोक्षच लावूया आपल्या वादाचा. आज संध्याकाळी आपण तिघे त्रिवेदी महाशयांकडे जावू. त्यांना आधी काही सांगायचे नाही. फार काय मी सतीश आहे हे ही सांगायचे नाही. माझ्या दाढी - मिशांच्या जंजालात त्यांना मला ओळखताही यायचे नाही. मी मिराचा एक आत्येभाऊ असेच सांगू. आणि त्यांना सतीश खुबचंदानी जिवंत आहे का, आता कुठे आहे ते सांगायचे आव्हान देऊ. त्यांच्याकडे माझी जन्मपत्रिका आहेच. पाहू या त्यांचे त्रिकालज्ञान हे आव्हान पेलू शकते का!"

पार्वतीबाई हे आव्हान ऐकून अस्वस्थ झाल्या. पण किंचित् विचार करुन त्यानी मान डोलावली आणि म्हणाल्या "आव्हान मान्य आहे. पण जर त्रिवेदी महाशयांनी ते पेलून दाखवले तर तुम्ही फलज्योतिषाला शास्त्र म्हणून मानले पाहिजे."

"अवश्य! मात्र ह्या त्रिकालज्ञानी महाराजांनी काही मोघम गुळगुळीत वक्तव्ये करता कामा नये. आणि आपण तपासू शकू अशी विधाने पाहिजेत." सतीश म्हणाला. "पाहू या माझ्या हकिगतीतल्या किती गोष्टी ते सांगू शकतात."

"माझी खात्री आहे महाराज हे आव्हान पेलतील! संध्याकाळी सहा वाजता त्यांच्याकडे जाऊ या. त्या वेळी गर्दीला सुरुवात झाली नसते ... बरं मी देवळात जाऊन येते!"

"आत्ता? ही तुझी नेहमीची वेळ नव्हे!" मिरा आश्चर्याने म्हणाली.

"अगं हा नेहमीसारखा दिवस आहे का? जावईबापू नास्तिक असले तरी ते परत आल्याबद्दल - सुखरुप आल्याबद्दल - देवाचे आभार मानायला नकोत का?"

"मग मी पण येऊ तुझ्याबरोबर?" मिराने विचारले. पार्वतीबाई स्मित करुन उत्तरल्या "तू सावकाश नंतर जा! आत्ता चकोर - चकोरींचा संवाद चालू दे!"

"इश्श!" मिरा उद्गारली.

* * *

संध्याकाळी सहा वाजता पाच लोक प्रख्यात होराभास्कर रमाकान्त त्रिवेदींच्या मंत्रणा कक्षात दाखल झाले. पार्वतीबाई, सतीश, मिरा ह्या तिघां व्यतिरिक्त मिराची एक मैत्रीण आशा आणि तिचा नवरा विजय हे पण बरोबर होते. ह्या दोघांना त्यांनी निष्पक्षपाती निरीक्षक म्हणून बरोबर घेतले होते. त्यांचा फलज्योतिषावर विश्वासही नव्हता आणि अविश्वासही त्यांना सतीशची सर्व हकिगत आधीच सांगितली होती.

काही वेळांने सर्वांना पंडितजींच्या आतल्या खोलीत पाचारण करण्यात आले. पंडितजींच्या रुबाबदार चेहऱ्यावर बुद्धिमत्ता आणि विद्वत्ता जणू चमकत होती.

"या पार्वतीबाई ! आज मिरालाही घेऊन आलात आणि हे कोण?" त्यांनी विचारले.

"ही मिराची मैत्रिण आशा, हे तिचे यजमान विजय ... आणि हा मिराचा आत्येभाऊ दीपक. दीपक आणि विजय सतीशनां चांगले ओळखत होते. त्यांना

सतीश बद्दल माहिती पाहिजे ... वायुसेनेच्या ऑफिसकडे तीन वर्षांपूर्वी सतीश हरवले त्यानंतर काहीच माहिती नाही. त्यांनी तर सतीश हयात नाहींत असेच मानले." पार्वतीबाई म्हणाल्या.

"आई! सतीश हयात आहेत असे माझे अंतर्मन सांगते. मागे पंडितजींनी तसाच निर्वाळा दिला होता ..." मिरा एकदम म्हणाली.

"होय मिरा! पण आज परत त्याची पत्रिका पाहून मगच सांगतो. पंधरा मिनिटे थांबाल का? इथेच बसा पण मी पत्रिका पाहात असताना बोलायचे नाही."

"मान्य आहे" पार्वतीबाई म्हणाल्या "आपण त्रिकालज्ञानी सांगाल ते खरे"

"पण पंडितजी! मी आधीच एक गोष्ट आपल्या कानावर घालू इच्छितो. मी तुमच्या ह्या शास्त्रावर विश्वास ठेवत नाहीं. तेव्हा उगीच मोघम शब्दांत काहीतरी सांगू नका!" 'दीपक' एकदम म्हणाला.त्याच्या हातावर हळूच चापट मारुन मिराने त्याला शांत व्हायची सूचना केली.

पंडितजींनी स्मित केले आणि सौम्य स्वरात म्हणाले "तुमचा विश्वास असो वा नसो, त्याचा माझ्या कथनावर काहीही परिणाम होणार नाहीं. पत्रिका मला काय सांगते ते मी तुम्हाला सांगणार. पार्वतीबाई मला त्रिकालज्ञानी म्हणून हरभऱ्याच्या झाडावर चढवतात. पण ह्या जगात प्रत्येक मर्त्याच्या ज्ञानाला मर्यादा असते. मी त्याला अपवाद नाही. मी सांगेन त्यांत काही गोष्टी स्पष्ट असतील तर काही मोघम"

त्यानंतर दहाबारा मिनिटे पंडितजी एक पत्रिका पाहून टिपणे करीत होते. अखेर ते आपले टिपण घेऊन उपस्थितांकडे वळले. त्यांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. ते म्हणाले. "मी तुम्हाला फक्त उत्तर सांगतो, त्या मागची कारणमीमांसा नाही. तेव्हा त्याबद्दल विचारु नका. प्रथम एक चांगली बातमी ... सतीश जिवंत आहे, भारतात आहे आणि लवकरच इथे येईल ... कदाचित् येऊन पोचलाही असेल ..."

बेडेकर
गरम मसाला
स्पेशल
कोंबडी व मटणाचा
खास मसाला

व्ही.पी.. बेडेकर मसालेवाले, मुंबई ४

"काय म्हणता? फॅण्टॅस्टिक!" विजय उद्‌गारला.

"गप्परे! पंडितजींना उगीच टोकू नकोस ... पंडितजी पुढे सांगा ना, तो होता कुठे इतके दिवस?" दीपकने विचारले.

"पश्चिमेकडल्या एका देशात ..." पंडितजी म्हणाले.

"ह्यालाच मी मोघमपणा म्हणतो ... पश्चिम म्हणजे पाकिस्तान ते अमेरिका बरेच देश आले" दीपक म्हणाला.

"गप्प रे! आता तूच टोकलेस. त्यांना बोलू तर दे" आता विजयने चापले.

"धन्यवाद! मी सांगतच होतो की तो दोन वर्षे तरी पाकिस्तानात होता." पंडितजी म्हणाले. "आता तो काय करत होता वगैरे ऐकायचे असेल तर मन घट्ट करायला पाहिजे, निदान मिराने तरी ... मी मला ह्या पत्रिकेत जें दिसते ते सांगतोय ..."

मिरासकट पाचही श्रोत्यांच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह उमटले. पंडितजी बोलत होते.

"मला भारतीय विमानतळावर विमानात बसलेला सतीश दिसतो. तो उडण्यापूर्वी वर्दीच्या आतल्या खिशातून एक छाया चित्र काढून टक लावून पाहतोय. एका सुंदर तरुणीचे ते चित्र असावे, गोरी, घाऱ्या डोळ्यांची."

मिरा गोरी मोरी झाली. ती काळी सावळी व काळ्या डोळ्यांची होती. सतीशनेओठ चावले.

"आता पुढचे चित्र आहे सतीश पॅराशूट घेऊन खाली उतरतानाचे. दरम्यान काय झाले ते मला सांगता येत नाहीं ... पुन्हा एक चित्र दोन गुंड एका म्हाताऱ्याला लुबाडताहेत. सतीश दोन गोळ्या झाडून गुंडांना लोळवले ... म्हातारा सतीश चे आभार मानतो."

"वाऽऽ व! हा म्हातारा कोण?" विजय उद्‌गारला पार्वतीबाईंनी चोरुन सतीश तथा दीपककडे पाहिले. त्याच्या चेहऱ्यावरचे आश्चर्य पाहून समाधानाची लकेर उमटली. त्यांना अंधश्रद्ध म्हणून हिणवणाऱ्या जावईबापूंची चांगली जिरत होती.

"मी आधीच सांगितले, माझे ज्ञान मर्यादित आहे." पंडितजी सौम्यपणे म्हणाले."मला त्या म्हाताऱ्या मुसलमानाचे -तो दाढीच्या ठेवणीवरुन मुसलमान वाटतो- नाव माहीत नाहीं. पण तो सुखवस्तू आहे. बऱ्यापैकी मोठे घर असावे ... बायको आणि मुलगी घरी आहेत ..."

"मुलगी? एकदम दीपकने विचारले आणि जीभ चावली.

"तरुण मुलगी... वीसबावीस वर्षाची ... म्हातारा सतीशला घरी आणतो आणि त्याचा आदराने पाहुणचार करतो. त्याच्या शौर्याचे वर्णन ऐकून आणि त्याच्या रुबाबदारपणावर मुलगी फिदा होते. तिचे आईवडील सतीशला गळ घालतात आणि त्यांचे लग्न लावतात. ... मिरा मी तुला आधीच सांगितले होते की सर्व ऐकताना मन घट्ट ठेवावे लागेल."

"सतीश इज ए लकी डॉग... आधी ती गोरी घारी आणि आता ही कोण महबूबा?" दीपककडे मिश्किलपणे पाहात विजय उद्‌गारला.

"वात्रटपणा करु नका" त्याला आशाने चापले. तिने मिराला डोळे पुसायला रुमाल दिला.

"पुढे ऐकणार?" पंडितजींनी विचारले.

"होय! सांगा ना आमच्या जावईबापूंचे प्रताप." पार्वतीबाई म्हणाल्या.

"सतीश काही महिने सुखात घालवतो, पण त्याला तेथे असुरक्षित वाटत असते. शेवटी तो तेथील सर्वांना गुंगारा देवून रात्री निसटतो आणि हायकिंग करत सिंध प्रांतात जातो. तिथे, मला वाटते भारतीय सीमेजवळ इस्लामगढ मध्ये येतो. तात्पुरती

नोकरी धरतो एका लहान होटेलात ... आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाने होटेलच्या मालकीणबाईंना भुरळ घालतो..." पंडितजी टिपण पहात उद्‌गारले.

"पुरे झाला हा तमाशा!" एकदम 'दीपक' उद्‌गारला. तो उठून उभा राहिला.

"का बेटा? ऐकवत नाही का? पण सत्य कधी कधी कटु असू शकते." पंडितजी म्हणाले. त्यांनी मिराकडे पाहिले. ती पदरात डोके खुपसून मुसमुसत होती. पार्वतीबाईंच्या चेहऱ्यावरही ऐकले तेवढे पुरे असा भाव होता. त्या उठल्या आणि पंडितजींची 'फी' तेथे ठेवलेल्या कॅशबॉक्स मध्ये घालून बाहेर पडल्या.

* * *

"सर्व काही धादांत खोटे होते." सतीश बाहेर पडताच तावातावाने उद्‌गारला.

"सर्व काही? मग काही भाग तुझ्या गोष्टीशी जुळत कसे होते?" निष्पक्षपाती पंचाच्या सुरात विजयने विचारले "का तू जी गोष्ट सांगितलीस तीच काही भाग वगळून सांगितलीस का? बाकी मला कौतुक वाटते पंडितजींच्या सामर्थ्याचे...

"होय त्रिकालज्ञानीच ते! पण आता वाटायला लागलेय की आपल्या सुखाकरता सगळे काही माहीत असू नये. पार्वतीबाई उत्तरल्या. "ते नेहमी असेच सांगतात."

"पण मिरा! मी शपथेवर सांगतो मी सांगितलेली हकिगतच पूर्ण सत्य होती. पंडितजींनी त्यांत वेगळाच मीठमसाला भरला... मी पुन्हा सांगतो मिरा, मी तुझ्याशीच एकनिष्ठ होतो..."

"काही थापा मारु नका ... माझाही आधी फलज्योतिषावर विश्वास नव्हता. पण आज तू सांगितलेल्या हकिगतीतले काही भाग पंडितजींनी हुबेहुब कसे सांगितले?" मिरा झपझप पावले टाकत पुढे निघाली.

सतीशने ओळखले की ह्या चौघांपैकी कोणीही आपल्या बोलण्यावर विश्वास ठेवणार नाहीत. पण त्याला देखील हाच प्रश्न सतावत होता ... आपल्या गोष्टीतला सत्य भाग तरी पंडितजी कसे सांगू शकले? बाकीच्या चौघांना पुढे जाऊ देत तो रस्त्यावरच्या एका चहाच्या दुकानात चहा घेत बसला.

चहाचे घोट घेता घेता त्याचे विचारचक्र चालू होते, हाच कूट प्रश्न सोडवण्यासाठी. फलज्योतिषाच्या आजवरच्या चाचण्यांवरुन त्याची खात्री होती की पत्रिकेवरुन पंडितजींना त्याच्या गोष्टीतला सत्य भाग कळणे शक्य नाही. मग त्यांना तो कळला कुठून?

चहाचे पाच कप खलास झाल्यावर त्याची ट्यूबलाइट पेटली.

"यूरेका ... यूरेका" म्हणत गल्ल्यावर पैसे भरुन तो धावतच घरी निघाला. पण वाटेत देवळात चक्कर टाकून ...

* * *

घरी पण विजय, आशा, मिरा आणि पार्वतीबाई चहा घेत गंभीर चर्चेत गुंतले होते. सतीशला पाहून विजय म्हणाला.

"वेलकम मिस्टर कॅसानोव्हा! आधी मिरावहिनी, मग ती गोरीघारी, नंतर मुहम्मदभाईची ती महबूबा, मग इस्लामगढ मधला चाँदसा चेहरा... पुढे थरच्या वाळवंटात राजस्थान मध्येही कोणी राजकुँवर गाठलीस का? ... आपल्याला तर बुवा फलज्योतिषाच्या खरेपणाचा इतका उत्तम नमुना मिळाला नव्हता."

"विजय! तुझ्या गोष्टीत एक चूक आहे." सतीश गंभीर चेहरा ठेवून म्हणाला.

"काय? आता सगळेच चूक आहे, असे काही म्हणू नका... आमचा विश्वास बसणार नाही" मिरा रागाने कडाडली. ह्या गडगडाटा पाठोपाठ डोळ्यातून पाऊस पडण्याची लक्षणे दिसू लागली.

"नाही! बहुतेक बरोबर आहे. तपशिलात फरक इतकाच की ती गोरी - घारी ही पहिली, मिरा नंबर दोन ..."

"म्हणजे, तुझे पहिले लग्न तिच्या बरोबर?"

"ती गोरी घारी मंजुळा मला कोकणात भेटली. आमचे लग्न झाले आणि ती माहेरी रत्नागिरीला गेली व मी उत्तरेकडे आलो. तिथे मिरा भेटली... पण मंजुळा जिवंत असल्याने आपले लग्न बेकायदा ठरते मिरा ..." चेहऱ्यावर उदास भाव आणत सतीश उद्‌गारला.

"हे खोटे आहे सगळे ... मंजुळा अशी कोणी नव्हतीच!" पार्वतीबाई म्हणाल्या.

"असे कसे म्हणता? पंडितजींनी तर तिच्या फोटोचे वर्णन केले. आणि तुम्हाला एक प्रश्न विचारु? तुम्ही आज बारा वाजता देवळात जातो म्हणालात पण देऊळ तर बारा ते दोन बंद असते. मग तुम्ही होता कुठे तासभर? का वाट चुकून पंडितजींकडे गेलात?"

पार्वतीबाईंनी होकारार्थी मान हलवली, व म्हणाल्या "मी केवळ त्यांना आम्ही सहा वाजता येतो हे सांगायला गेले. पण त्यांनी आडवे तिडवे प्रश्न विचारुन आणि ज्ञानाची भीती दाखवून सगळी माहिती काढून घेतली. मला साडेसाती चालू आहे तेव्हा ते विचारतील ती माहिती सांगणे भाग होते."

आता सगळ्यांची ट्यूबलाइट पेटली. सतीश मिराकडे पाहून म्हणाला "मिरा, आता तुझ्यापुढे दोन पर्याय आहेत. पर्याय एक. पंडितजींनी आपल्या सामर्थ्याने सांगितलेल्या एकूण एक घटना सत्य आहेत, व मी आत्ताच सांगितल्याप्रमाणे तू माझी पत्नी नंबर दोन आहेस. माझ्या सारख्या अनेक प्रेमप्रकरणे पचवणाऱ्याचा धिक्कार करुन तू मला घरातून हाकलून द्यावेस. **पर्याय दोन.** मी सांगितलेल्या हकिगतीत पंडितजींनी मीठमसाला भरुन तुम्हाला ऐकवली. खरे म्हणजे मी पहिल्यापासून तुझ्याशी एकनिष्ठ राहिलो आहे. तेव्हा माझा स्वीकार कर... सांग तुला कुठला पर्याय निवडायचा आहे?"

मिराने मान वर करून पाहिले तेव्हा सतीशने उजवा डोळा मिचकावला. त्याच्या चेहऱ्यावर मिश्किल स्मित होते पण त्याचे दोनही डोळे पाणावलेले होते. ■

(मूळ कल्पना W.W. Jacobs ची कथा The castaway)